# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ११.०४.२०२५

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि.१०/०४/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,०४,२५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१०/०४/२०२५ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ३,२१० /—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. १०/०४/२०२५ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०६ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १०,०७०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे

**सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ (COPTA 2003) अंतर्गत विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्य दि. १०/०४/२०२५ रोजी सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ अन्वये हिंगोली जिल्हा येथे एकुण ०३ ठिकाणी कलम २४ अन्वये गुन्हे दाखल झाला असुन एकुण मिळालेला माल ४५,००/— रू यातील आरोपी हा शासनाने विशिष्ट क्षेत्रामध्ये प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य वस्तु व सिगारेट बिडी जन्य पदार्थ साठवुन वितरीत करीत असतांना मिळुन आला सदर तंबाखुजन्य पदार्थाच्या पुडयावर चित्रमय रेखाटनासह वैधानिक इशारा छापलेला आहे तर काही पदार्थावर तो अस्पष्ट किंवा नियमान्वये ठरवुन दिलेल्या मापदंडप्रमाणे नव्हता अशा स्वरूपात प्रदर्शीत करून मिळुन आला म्हणुन गुन्हा.